# सृष्टिज्ञान

**संस्थापक :**
कै.प्राचार्य गो. रा. परांजपे
कै. डॉ. दि. धों. कर्वे
कै. प्रा. स. बा. हुदलीकर

**मार्गदर्शक :**
डॉ. रघुनाथ माशेलकर
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. विजय भटकर
डॉ. शेखर मांडे

**सल्लागार :**
ले. ज. डॉ. माधुरी कानिटकर (निवृत्त)
डॉ. भूषण पटवर्धन
डॉ. प्रदीप कुरुलकर

**संचालक :**
डॉ. योगेश शौचे
डॉ. मानसी माळगांवकर
डॉ. क. कृ. क्षीरसागर
श्री. र. वि. कुलकर्णी

**संपादक :**
रमेश दाते

**सहसंपादक :**
डॉ. प्रभाकर इंगळे
सत्यजित जोशी

**मुखपृष्ठ मांडणी व सजावट :**
मिलिंद जोशी, अनुपम क्रिएशन्स, पुणे

या अंकाची किंमत : रु. ४०.००
वार्षिक वर्गणी : रु. ४००.००

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
'सृष्टिज्ञान', c/o विज्ञान भारती
काशी निवास, सुभाषनगर गल्ली क्र.६,
१२६१ शुक्रवार पेठ, पुणे ४११००२.
फोन नं.: ०२०-२४४७४२९५
ई-मेल : sci.vibha@gmail.com


# प्रादेशिक असमतोल दूर करूया

विज्ञान भारती संस्थेने सृष्टिज्ञान मासिकाची जबाबदारी घेतल्यानंतरचा पहिलाच अंक मार्च २०२३, या अंकाचे प्रकाशनाचा अत्यंत छोटेखानी सोहळा, सृष्टिज्ञानचे मार्गदर्शक डॉ. रघुनाथ माशेलकर यांचे हस्ते त्यांचेच कार्यालयात, नववर्षदिन चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा) या मुहुर्तावर पार पडला.

या वेळी सृष्टिज्ञानला पुढील वाटचालीबद्दल मार्गदर्शन करतांना डॉ. माशेलकर यांनी एका विरोधाभासाकडे लक्ष वेधले. आपल्या देशाचे दोन पैलू आहेत एक  म्हणजे झपाट्याने प्रगती करणाऱ्या तरुण पिढीच्या रूपाने आपण नित्य गोडवे गातों तो झळकणारा पैलू. परंतु तशी जनता व बहुतेक शहरवाशीय अशी देशाच्या लोकसंख्येच्या केवळ २५ ते ३० टक्के आहे. ७० ते ७५ टक्के जनता खेड्यात राहणारी, अत्यंत मागासलेली, प्रगतीच्या वाटा रोखल्या गेलेली, व अंधारे भविष्यकाळ असणारी आहे. हे वास्तव आपण स्विकारून ही परिस्थिती बदलण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

या समस्येचे उत्तर बहुतांश राजकीय नेत्यांच्या व प्रशासकीय यंत्रणेच्या सकारात्मक इच्छाशक्ति मध्ये आहे. परंतु सृष्टिज्ञानही खारीचा वाटा उचलू शकते. शहरी विद्यार्थी/शिक्षक व ग्रामीण विद्यार्थी/शिक्षक यांच्यातील दरी, सृष्टिज्ञानाच्या रुपाने विज्ञान व तंत्रज्ञानाचा प्रसार ग्रामीण भागात झाल्यास अंशतः भरून निघेल. यासाठी विज्ञानभारती प्रयत्नशील तर राहीलच, परंतु वाचकांनाही आवाहन आहे की, त्यांनी ग्रामीण भागातील शाळांमध्ये सृष्टिज्ञान मासिक पोहोचेल यासाठी प्रयत्न करावा.

मार्च अंकाचे प्रकाशनाचा अनौपचारिक समारंभ दि. २५ मार्च रोजी, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, या संस्थेचे संचालक डॉ. मोहन वाणी व विज्ञान भारती (पश्चिम महाराष्ट्र) चे अध्यक्ष डॉ. योगेश शौचे यांचे उपस्थितीत पार पडला. त्यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. वाणी म्हणाले की, विविध विषयांतील विज्ञानाचे पैलू उलगडण्याचा प्रयत्न या नियतकालिकामुळे होईल. तसेच नवीन वितरण व्यवस्था विकसित करताना विज्ञानभारतीने शहरी व ग्रामीण भागास समान महत्व द्यावे.

---

या अंकातील लेख त्या त्या विषयांतील तज्ञांनी लिहिलेले आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

तर डॉ. योगेश शौचे यांनीही शहरी व ग्रामीण विद्यार्थ्यांना विज्ञान प्रसाराची फळे सम प्रमाणात मिळावीत असे मार्गदर्शन करतानाच ग्रामीण भागातूनही लेखक व वाचक तयार करण्यावर भर देऊ असे सांगितले. यावेळी सृष्टिज्ञानच्या पूर्वीच्या संपादक मंडळाचा व कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा सत्कारही करण्यात आला व त्यांनी आताही सृष्टिज्ञानाच्या कार्यास हातभार लावू असे आश्वासनही दिले.


स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतांना आपण स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय वैज्ञानिकांचे योगदान मांडत आलो आहोतच, परंतु त्यातील महिला वैज्ञानिकांच योगदान थोडे अज्ञातच राहिले म्हणून या काळातील महिला वैज्ञानिकांची माहिती या व यापुढील काही अंकात घेत आहोत. गुळवेल या वनस्पतीला आयुर्वेदात फार महत्व आहे. त्याचा परामर्ष डॉ. कुंभार यांनी घेतला आहे. जाने-फ्रेब्रु जोडअंकात पूर्वार्ध असलेल्या ‘कहाणी विश्वोत्पत्तीची’ या लेखाचा उत्तरार्ध या अंकात घेतला आहे. तर गहु हा लेख एका नव्या तृणधान्यविषयक लेखमालेतील पहिला लेख आहे. हे वर्ष आंतरराष्ट्रीय तृणधान्ये वर्ष असल्याने ही मालिका मुद्दाम सुरू केली आहे. नेहमीची अन्य सदरे व लेखांची जोड आहेच.

याचवेळी एक नवीन पराक्रम प्रगत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इस्त्रो या संस्थेने केला आहे. त्याचे कौतुक करणे उचित होईल. एकाच वेळी ३६ परदेशीय उपग्रहांचे यशस्वी प्रक्षेपण २६ मार्च रोजी झाले. कमी उंचीवर परिभ्रमण करणाऱ्या एकूण ७२ उपग्रहांपैकी हा भाग आहे. यामुळे इस्त्रो च्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा तर खोवला गेला आहेच पण त्याबरोबर देशाला मोठ्या प्रमाणावर परकीय चलन मिळणार आहे. इस्त्रो च्या सर्व वैज्ञानिक व तांत्रिक चमुचे मनपूर्वक अभिनंदन.

**रमेश दाते**

sci.vibha@gmail.com

**॥ भावपूर्ण आदरांजली ॥**



माननीय खासदार, श्री. गिरीश भालचंद्र बापट यांचे बुधवार, दिनांक २९ मार्च २०२३ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

महात्मा फुले वस्तू संग्रहालयाचे विश्वस्त या नात्याने सृष्टिज्ञान मासिकाचे ते गेली २५ वर्षे आधारस्तंभ होते. सृष्टिज्ञान मासिकाच्या यशस्वी वाटचालीत त्यांचे योगदान मोलाचे होते. या मासिकाच्या जुलै २०११ मध्ये प्रकाशित झालेल्या १००० व्या अंकाचेही ते साक्षीदार होते. मात्र मासिकाच्या शताब्दी पूर्तीचे वेळी ते नसतील हे दुर्दैव.

सृष्टिज्ञानला मदत होईल, असे अनेक उपक्रम त्यांनी राबवले. नवोदित लेखकांसाठी विज्ञान लेखन कार्यशाळा, विज्ञान कथा व विज्ञान लेख स्पर्धा, प्रदर्शने, विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रयोग कार्यशाळा, विज्ञान चित्रपट प्रदर्शने, अशा विविध उपक्रमांचा त्यात समावेश होता. या कल्पक उपक्रमांना श्री. बापट यांनी नेहमी सक्रिय सहाय्य केले.

त्यांचे राजकीय क्षेत्रातील स्थान तर अद्वितीय होते हे आपणांस माहित आहेच.

सृष्टिज्ञान मासिकाला आता त्यांचे मार्गदर्शन लावणार नाही याबद्दल खंत वाटते.

त्यांना भावपूर्ण आदरांजली.

– संपादक मंडळ

SRISHTIDNYAN (RNI No. 21321/1973 Dt. 11 Oct. 20 100)
‘सृष्टिज्ञान’ हे मासिक मालक विज्ञान भारती पुणे यांचे साठी मुद्रक व प्रकाशक रमेश दाते यांनी प्रतिमा ऑफसेट, कोथरुड इंडस्ट्रियल एरिया, कोथरुड, पुणे ४११०३८. येथे छापून विज्ञान भारती १२६१ शुक्रवार पेठ, काशी निवास, सुभाषनगर, गल्ली क्र.६, पुणे ४११००२. येथे प्रसिध्द केले.